२९

**लिपिक, सहायक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा कक्षअधिकारी पदावर पदोन्नतीदेण्यासाठी घेण्यात येणारी परीक्षा व सरळसेवेने नियुक्त झालेल्या कक्ष अधिकाऱ्यांची विभागीय परीक्षा**

**दोन वर्षापूर्वीच्या उत्तरपत्रिका नष्ट करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-१०९४/प्र.क्र.७/९४/१७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६ एप्रिल,१९९४

## परिपत्रक

मंत्रालयीन विभागातील लिपिक व सहायक यांच्या सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा तसेच कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षा आणि सरळसेवेने नियुक्त झालेल्या कक्ष अधिकाऱ्यांच्या विभागीय परीक्षांच्या उत्तरपत्रिका साधारणपणे किती कालावधीपर्यंत जतन करुन ठेवण्यात याव्यात, याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. यासंबंधीच्या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

वरील चारही परीक्षांच्या अंतिम दोन वर्षांच्या उत्तरपत्रिका जतन करुन ठेवून त्यापूर्वीच्या उत्तरपत्रिका नष्ट करण्यात याव्यात. उत्तरपत्रिका नष्ट करतांना, त्यांचे गोपनीय स्वरुप लक्षात घेऊन, आवश्यक ती काळजी घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

sd/-

**( दा.र.राणे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड नस्ती.
*पत्राने.